स्थापना १९३९
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# किसानधनचे व्यवसाय विस्तारीकरण

**मुंबई :** देशातील अग्रगण्य मल्टी-अ‍ॅसेट अ‍ॅग्री फायनान्स कंपनी आणि एसएलसीएम समूहाची उपकंपनी असलेल्या किसानधनने महाराष्ट्रातून ३४ ते ४० टक्के एफपीओ व्यवसाय करण्याचे लक्ष्य ठेऊन आपल्या कामकाजाची सुरूवात केली आहे. राज्यभर विस्तारीकरणाच्या उद्देशाने कंपनीने नुकताच राज्यातील १३ एफपीओ बरोबर करार केला आहे. त्यानुसार त्यांना ३.५ कोटी रुपयांचे कर्ज देखील वितरित केले आहे. देशातील एफपीओ वाढवण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळेच शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ) मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. २०२७-२८ पर्यंत १०,००० नवीन एफपीओ सेटअप आणि प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या वर्षी सरकारने १०,००० शेतकरी उत्पादक संघटनांची निर्मिती आणि प्रोत्साहनया केंद्रीय क्षेत्र योजनेला मंजूरी दिली आहे. या योजनेचा अर्थसंकल्पीय खर्च ६८६५ कोटी रुपये आहे.